# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र. १०७२/२०२०/नशिक

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. मधुकर वामन कांगणे, भावसा सोसायटी,आरटीओ कार्नर, नाशिक, ता.जि.नाशिक. | उप अभियंता, नगररचना विभाग, नाशिक महानगरपालिका, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक, ता.जि.नाशिक. | कार्यकारी अभियंता, नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक, ता.जि.नाशिक. |

### व्दितीय अपिल सुनावणी दिनांक – १८/०८/२०२३

| मुळ अर्ज दिनांक | मुळ अर्ज जमाअ यांना प्राप्त दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०७/०२/२०२० | १०/०२/२०२० | ------- | ०९/०३/२०२० | ------- | ------ |

अपिलार्थी यांनी दि. २०/०५/२०२० रोजीच्या अर्जान्वये "जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने व अपिल अधिकारी यांनी मुदतीत सुनावणी न घेतल्याने" असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

२. सदर व्दितीय अपिलाच्या सुनावणीस – तत्कालीन जन माहिती अधिकारी आणि तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असून, अन्य पक्षकार उपस्थित होते.

३. अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी (पंचवटी) नाशिक यांनी सादर केलेल्या दि.२७/०१/२०२० च्या पत्रावर वेळोवेळी केलेली कार्यवाही बाबत माहिती.

४. तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये " माहिती न मिळाल्याने " असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

५. या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे आणि युक्तिवादावरुन असे दिसून येते की,

१) अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर नियोजन विभाग नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी दि.०७/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वेय कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

२) अपिलार्थीनी दाखल केलेल्या प्रथम अपिल अर्ज दि.०९/०३/२०२०च्या अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नगर नियोजन विभाग नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे दिसून येत नाही.

३) सुनावणी दरम्यान विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१८/०८/२०२३ च्या पत्रान्वये अपिलार्थीनी अपेक्षिलेली माहिती बाबत कार्यवाही पूर्ण केलेली आहे असे आयोगास सांगितले आहे. तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नगर नियोजन विभाग नाशिक महानगरपालिका, नाशिक हे सेवानिवृत्त आहे आणि तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर नियोजन विभाग नाशिक महानगरपालिका,नाशिक हे मयत असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आनुण दिले.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर नियोजन विभाग नाशिक महानगरपालिका नाशिक यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली उपलब्ध माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे तात्काळ विनामूल्य उपलब्ध करुन दयावी.

वरील आदेशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

प्रत - माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

महानगरपालिका आयुक्त, नाशिक महानगरालिका, राजीव गांधी भवन, शरणपूर रोड,नाशिक.

यांना कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्र.केंमाअ-२००८/६८८/प्र.क्र.२१९/०८/९ (मा.अ.) दि.१०/०६/२००८ मधील सुचनांनुसार आयोगाने दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात येईल याची दक्षता घ्यावी. तसेच सदरचा आदेश सर्व संबंधितांवर बजावून त्याची दिनांकित पोच आयोगास सादर करावी.

जावक क्र. आ- ९०६ 2 6 MAR 2024